N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

**1. District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** जामखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0613 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/12/2024 14:35

| **2. S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरुवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 30/05/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/05/2024
   **Time From (वेळेपासून):** 13:33 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:23 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/12/2024 **Time (वेळ):** 14:14 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 016
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/12/2024 14:14 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 20 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तलाठी कार्यालय, हाळगाव ता जामखेड ,ता जामखेड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): सुजल सोमनाथ ढवळे

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 2001

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रा हळगाव, ताजामखेड, ताजामखेड,जामखेड,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रा हळगाव, ताजामखेड, ताजामखेड,जामखेड,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-8600652877

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुजीब अब्दुलरब शेख | | | 1. सजा हाळगाव ता जामखेड , जामखेड ,जामखेड,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 05/12/2024

मी सुजल सोमनाथ ढवळे, वय 23 वर्षे, धंदा-शिक्षण, रा. हळगाव, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर .
समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर राहणेस आहे. मी दि. 30/05/2024 रोजी हाळगाव ता. जामखेड येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहुन पोलीस उपअधीक्षक श्री.लोखंडे, ला.प्र.वि.अहिल्यानगर यांना दोन पंचासमक्ष लाचमागणीची तक्रार सांगितली होती की, '' मौजे हाळगाव येथील गट नं. 155 मधील 1 हेक्टर 10 आर ही जमिन माझी आज्जी श्रीमती सुशिलाबाई मारुती ढवळे हिच्या नावावरुन माझे वडिल श्री. सोमनाथ मारुती ढवळे यांच्या नावे खरेदी केली आहे व गट नंबर 154 मधील 2 हेक्टर 30 आर ही जमिन माझे चुलते श्री. भिमराव मारुती ढवळे यांच्या नावा वरुन वडिलाच्या नावे एक महिन्यापुर्वी खरेदी केली आहे. खरेदी झाल्यानंतर खरेदी खताची नोंद 7/12 उता-यावर होण्यासाठी मी व माझे वडिल तलाठी कार्यालयात गेलो होतो. तेथे आम्ही खरेदी दस्त तलाठी शेख यांचेकडे दिले व 7/12 उता-यावर वडिलांच्या नावाची नोंद करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी तलाठी शेख यांनी एवढया खरेदीच्या नोंदी घेण्यासाठी 3000/- रुपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे लाचेची मागणी करत आहेत. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. त्यानंतर दि.28/05/2024 रोजी तलाठी शेख यांनी माझे मोबाईलवर कॉल करुन ऑफीसमध्ये येवुन माझी भेट घे, असे म्हणाले होते. मी 7/12 उतारा ऑनलाईन चेक केला असता त्यावर माझे वडिलांचे नाव दिसुन आलेले आहे. 7/12 उता-यावर नाव लागले असुन देखील शेख तलाठी हे लाचेची मागणी करत आहेत. मी आज रोजी तलाठी कार्यालय हाळगाव येथे जावुन तलाठी शेख यांची भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी माझे वर नमुद कामाबाबत माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कारवाई करावी.'' अशी तक्रार नोंदविली होती. पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी माझी वरील तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. त्या तक्रारीवर मी, दोन्ही पंचांनी व पो.उपअधी.श्री.लोखंडे यांनी सही केली. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे तलाठी शेख हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.

त्यानंतर पो.उप अधी.श्री.लोखंडे यांनी मला व दोन्ही पंचांना पडताळणी कारवाईमध्ये व्हाईस रेकॉर्डरचे वापराबाबत माहिती दिली. श्री. लोखंडे यांचे सुचनेवरून सापळा पथकातील पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून पो.उपअधी.श्री. लोखंडे, दोन्ही पंचांनी व मी निवेदन केले. त्यानंतर पो.उपअधी. श्री. लोखंडे यांनी मला व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून तो माझे ताब्यात देवुन मला व पंच नं. 1 यांना तलाठी शेख यांची भेट घेण्यासाठी 13/33 वा. माझेकडील दुचाकी मोटार सायकल क्र.एम.एच.16 सीआर 9046 वरुन रवाना केले. मी व पंच नं. 1 असे तलाठी कार्यालय, हाळगाव येथे गेलो. तेथे आम्ही तलाठी शेख यांची भेट घेतली. त्यावेळी माझेत व तलाठी शेख यांचेत आमच्या खरेदीखताच्या नोंदीबाबत चर्चा झाली. त्यानंतर तलाठी शेख यांनी त्यांचेकडील मोबाईलवर 10000 असा आकडा टाईप करुन मला दाखवुन एवढा खर्च आहे सगळा असे म्हणाले. त्यावर मी त्यांना एवढा खर्च असतो का? दहा हजार रुपये असे म्हणालो. त्यावेळी तलाठी शेख यांनी तीन नोंदी आहेत. दहा एकराच्या नोंदी एकरी आकडा बघ तु असे म्हणुन आमचे खरेदी खताच्या 7/12 उता-यावर नोंद केल्याच्या मोबदल्यात 10,000/-रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तेथुन निघुन पो.उप अधी.श्री लोखंडे व सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. ती वेळ 14/23 वाजताची होती. तेथे पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी मला व पंच नं.1 यांना तलाठी शेख यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यंतची हकीकत विचारली. त्यानंतर पो.उपअधी. श्री.लोखंडे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. तलाठी शेख यांनी माझेकडे आमचे खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावुन देण्यासाठी स्वतःकरीता

10,000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले. तलाठी शेख यांनी माझेकडे 10,000/- रुपये लाच रकमेची मागणी केली असल्याने त्यांचे विरुध्द तलाठी कार्यालय हाळगाव येथे लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. त्यानंतर पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी तलाठी शेख यांना लाच म्हणुन देण्यात यणारी 10000/-रुपये रक्कम त्यात 500/-रु. दराच्या 20 चलनी नोटा हजर केल्या. पासकिय वाहनात अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या वापराबाबत पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षिक सापळा पथकातील पोना काळे यांना करून दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवुन मी हजर केलेल्या नोटांना दोन्ही बाजुनी अँन्थ्रासिन पावडर लावली व सदरच्या नोटा माझे पॅन्टच्या पुढील उजवे बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी सर्वांना सापळा कारवाईदरम्यान करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पो.उपअधी.श्री. लोखंडे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे ताब्यात देवुन मला व पंच नं. 1 यांना तलाठी शेख यांची भेट घेण्याकरीता 16/18 वा. माझेकडील मोटार सायकलने तलाठी कार्यालय हाळगाव येथे रवाना केले. आमच्या पाठोपाठ पो.उपअधी.श्री. लोखंडे, सापळा पथक असे शासकिय वाहनाने येवुन तलाठी कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावुन थांबले. मी व पंच नं. 1 तलाठी कार्यालयाकडे गेलो. सदरचे कार्यालय बंद होते. तेथील एका इसमाने तलाठी शेख हे चोंडीला गेले असल्याचे सांगितले. त्यावेळी मी तलाठी शेख यांचे मोबाईलवर कॉल केला. परंतु तलाठी शेख यांनी कॉल उचलला नाही. त्यावेळी आम्ही रवाना केले त्या सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी निघालो असता वाटेत मला तलाठी शेख यांचा फोन आला. तलाठी शेख यांनी मला आलो आलो थांब अर्धा तास, साहेब आलेत इकडे असे बोलुन फोन कट केला. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तेथुन निघुन रवाना केले त्या ठिकाणी 16.34 वा.परत आलो. आमच्या पाठोपाठ पो. उपअधी.लोखंडे व सापळा पथक आले. तेथे पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी मला व पंच नं.1 यांना तलाठी शेख यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यंतची हकीकत विचारली. त्यानंतर पो.उपअधी. श्री.लोखंडे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. तलाठी शेख यांनी आलो थांब जरा अर्धा तास असे म्हणाले असल्याने पुढील सापळा कारवाई लोकसेवक शेख यांचा फोन आल्यानंतर करण्याचे ठरले. बराच वेळ वाट पाहुनही तलाठी शेख यांचा मला फोन आला नाही. तसेच तलाठी कार्यालय बंद होते. तेथील हजर एका इसमाने तलाठी शेख चोंडीला गेले आहेत असे सांगितले होते. तसेच दि.31/05/2024 रोजी चोंडी येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा जन्मोत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जातो. तेथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व इतर राजकीय नेते दरवर्षी येत असतात. तलाठी शेख याना तेथे ड्युटी लागते. त्यामुळे तलाठी शेख हे तलाठी कार्यालयात आल्यावर मी पो.उपअधी श्री. लोखंडे यांचेशी संपर्क करीन. त्यावेळी त्यांचे विरुध्द लाचेचा सापळा कारवाई आयोजित करा असे मी कळविले होते.त्यावेळी सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करुन मी सांगितल्याप्रमाणे तलाठी शेख हे ज्यावेळी तलाठी कार्यालयात हजर राहतील त्यावेळी त्यांचे विरुध्द लाचेची सापळा आयोजित करण्याचे ठरले.

दि. 01/06/2024 रोजी मला तलाठी शेख यांनी फोन करून तुमच्या खरेदीच्या नोंदी लागल्या आहेत आता माझ्याकडे तुमचे काही काम राहिले नाही. तुम्ही येवु नका असे सांगितले. त्यानंतर मी तलाठी शेख यांना वारंवार फोन केले, परतु त्यांनी माझे फोन घेतले नाही. त्यामुळे तलाठी श्री. शेख यांना माझेबाबत काहीतरी संशय आला असावा. त्याविषयी अनावधानाने सदरची माहिती पो.उपअधी.श्री. लोखंडे यांना सांगण्याचे माझेकडुन राहुन गेले. माझे बी.एस.सी.अॅग्रीचे शिक्षण लोणी प्रवरा येथे चालु असुन मध्यंतरीच्या कालावधीमध्ये मी कॉलेजला गेलो असल्याने मला पुढील कारवाईसाठी पो.उपअधी.श्री. लोखंडे यांना फोन करणे शक्य झाले नाही. तसेच त्यानंतर तलाठी शेख यांचा देखील मला आजपावेतो फोन आला नाही. त्यामुळे तलाठी शेख हे आता माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत अशी माझी खात्री झाली आहे. असे सांगुन सदरची सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करुन पुढील कायदेशीर कार्यवाही करावी असे मी पो.उपअधी श्री. लोखंडे यांच्या जागी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे नव्याने हजर झालेले पो.उपअधी श्री.त्रिपुटे यांना सांगितले. त्याप्रमाणे पो.उपअधी.श्री. त्रिपुटे यांनी माझा तसा जबाब नोंदवुन घेतला.

आज रोजी पो.उप अधी.श्री.त्रिपुटे यांनी माझेशी संपर्क करून कळविले की, 'तलाठी शेख यांनी दि. 30/05/2024 रोजी माझेकडे आमचे खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी तलाठी शेख यांनी स्वतःकरीता 10,000/-रु.लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत वरिष्ठ कार्यालयाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे कळविले व मला तलाठी शेख यांचेविरुध्द फिर्याद देणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी फिर्याद देत आहे.

तरी मौजे हाळगाव येथील गट नं.155 मधिल 1 हेक्टर 10 आर शेतजमीनीच्या खरेदीची व गट न. 154 मधिल 2 हेक्टर 30 आर या शेतजमीनीच्या खरेदीची नोंद माझ्या वडिलांच्या नावे 7/12 उता-यावर लावल्याच्या मोबदल्यात

तलाठी शेख, सजा हाळगाव यांनी माझेकडे दि. 30/05/2024 रोजी 13:33 ते 14:23 वा. दरम्यान तलाठी कार्यालय, हाळगाव ता. जामखेड येथे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याने माझी लोकसेवक मुजीब अब्दुलरब शेख तलाठी, तत्कालीन नेमणुक सजा हाळगाव ता. जामखेड जि. अहिल्यानगर, सध्या नेमणुक तलाठी, सजा सावरगावतळ, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Mahesh Vishnu Patil(I (Inspector)) / API

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer-in-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

पोलीस निरीक्षक
जामखेड पोलीस ठाणे

**Name (नाव):** Mahesh Vishnu Pat
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API